**जातीपाती विरहित समाज असावा-महात्मा बसवेश्वर** >> पान 2

**डोमगाव येथील बोगस रेशनकार्ड धारकांवर कायदेशीर कारवाई करा** >> पान 3

**धाराशिव-कळंब मतदारसंघात राजकीय आरवाडा पेटला** >> पान 4


### सुविचार

हाव सोडली की मोह संपतो
आणि मोह संपला की दुःख संपते.


# दैनिक आरंभ मराठी

www.arambhmarathi.com arambhmarathi535@gmail.com DAILY ARAMBH MARATHI

■ दैनिक ■ धाराशिव ■ वर्ष 1 ले ■ अंक 236 वा ■ शुक्रवार, दि. 18 ऑक्टोबर 2024 ■ TITLE CODE-MAHMAR52255 ■ पाने 4 ■ किंमत रू. 5



### 'समृद्धी'वरील अपघाताचे सत्र थांबता थांबेना; कारची ट्रकला धडक, चालक ठार

आरंभ मराठी । अकोला

समृद्धी महामार्गावर अपघातांचे सत्र थांबता-थांबत नसल्याचे चित्र आहे. वाशीम जिल्ह्यातील कारंजा तालुक्यात आज पुन्हा एकदा समृद्धी महामार्गावर भीषण अपघात घडला. धावत्या ट्रकला भरधाव कारने मागील बाजूने जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात कार चालकाचा घटनास्थळीच मृत्यू झाला. ही घटना १७ ऑक्टोबर रोजी पहाटे ६ वाजताच्या सुमारास समृद्धी महामार्गावरील लोकेशन १८२ वर घडली. बळीराम ग्यानबा पिसे (२४, रा. शिवनी (पिसा ) ता. लोणार जि. बुलढाणा) असे मृतकाचे नाव आहे.

# झकास रस्ते; पालिका-बांधकामच्या अधिकाऱ्यांची वरात काढा, पालकमंत्र्यासह-आमदारांना स्वागताला उभं करा !

## धाराशिवकरांनो, एवढं तरी करा, कारण..पुन्हा असे अधिकारी होणे नाही



आरंभ मराठी । धाराशिव

**शहरातल्या प्रत्येक रस्त्यांवर गतिरोधक बसवावे लागतील, इतकी सुसाट आणि विना सायास वाहने धावत आहेत. कुठेही अडथळा नाही की,खड्ड्यांचा त्रास नाही. मुख्य असो की अंतर्गत सगळे रस्ते कसे गुळगुळीत आहेत. खड्डा तर शोधूनही सापडणार नाही. खड्ड्यांची साधी कुणकुण लागली तरी नगर परिषदेच्या आणि बांधकाम विभागाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांची टीम धावत जाते आणि रस्ता पूर्ववत होतो, अगदी महानगरात सुध्दा इतकी सजगता, तत्परता नसेल !. मग अशा कर्तव्य तत्पर अधिकाऱ्यांचा मान-सन्मान कोण करणार, धाराशिवकरांनी एवढं तरी आता करावं. सजवलेल्या रथावरून पालिकेच्या आणि सार्वजिनक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांची वाजत गाजत शहरातल्या सगळ्या गुळगुळीत रस्त्यांवरून वरात काढावी. जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधी म्हणजे पालकमंत्री डॉ.तानाजीराव सावंत यांच्यासह खासदार ओमराजे निंबाळकर, आमदार राणाजगजितसिंह पाटील,आमदार कैलास पाटील, आमदार ज्ञानराज चौगुले यांनी चौकाचौकात हार घेऊन स्वागताला उभं राहावं.कारण असे अधिकारी पुन्हा होणे नाही.**

धाराशिवातील शहराच्या रस्त्यांचे कौतुक आणि त्यावरून होणारे राजकारण काही केल्या संपत नाही. रस्त्यावरून होणाऱ्या राजकारणाचा आणि आरोप-प्रत्यारोपाचा धाराशिवकरांना अक्षरश: वीट आलाय. नगर पालिकेच्या पदाधिकाऱ्यांचा कार्यकाळ संपून ३ वर्षे उलटली आणि विधानसभेच्या सदस्यांचा कार्यकाळ अंतिम टप्प्यात आहे. पालिकेवर खादाड अधिकाऱ्यांची तर सार्वजनिक बांधकाम विभागात माना डोलावणाऱ्या भ्रष्ट अधिकाऱ्यांची सत्ता आहे. भूयारी गटारसाठी खोदलेल्या रस्त्यांची अद्याप दुरूस्ती नाही. रस्त्यांची नवीन कामे झाली नाहीत आणि आहेत त्या रस्त्यांवर खड्डे करून ठेवण्यात आले आहेत. पालिका भ्रष्टाचारांच्या चौकशीच्या फेऱ्यातून अद्याप बाहेर पडलेली नाही,त्यामुळे विकास कामांचा पत्ताच नाही. छत्रपती शिवाजी महाराज चौक ते हातलाई मंदिरापर्यंत बार्शी रोडची अवस्था जीवघेणी आहे. खड्ड्यांमुळे अनेकांना कायमचे जायबंदी व्हावे लागले. शैक्षणिक परिसर असलेल्या रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, भोसले हायस्कुलच्या समोरील रस्त्यांवरून दररोज हजारो विद्यार्थी, महिला, मुली,ज्येष्ठ नागरिकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागतो. थोडाही पाऊस झाल्यानंतर नाल्यांचे पाणी रस्त्यावर येते आणि रस्त्याचे रूपांतर तलावात होते. प्रचंड घाण पाणी,त्यात निर्माण झालेले खड्डे आणि अधिकाऱ्यांकडून होणारी निव्वळ डोळेझाक. हे म्हणजे नागरिकांना जाणीवपूर्वक छळण्याचे घेतलेले टेंडर तर नाही ना, असा प्रश्न उपस्थित होतो.खेड्यांची अवस्था कितीतरी चांगली असून, जिह्याचे ठिकाण असलेल्या धाराशिव शहराला का छळले जातेय, याचे उत्तर कुणी लोकप्रतिनिधी किंवा अधिकारी देत नाहीत. पण, यावर बोलतील ते धाराशिवकर कसले..नागरिकांनो, आता निदान एवढं तरी करा, शहराला असे रस्ते देणाऱ्या अधिकाऱ्यांना सन्मानित करा आणि त्यांनी दाखवलेल्या कर्तबगारीबद्दल त्यांची या गुळगुळीत रस्त्यांवरून वरात काढा, कारण असे अधिकारी पुन्हा होणे नाही.




# आई राजा उदे उदे, सदानंदीचा उदो उदो... जयघोषात दुमदुमली तुळजापूर नगरी

### कोजागिरी पौर्णिमेनिमित्त दहा लाख भाविकांनी घेतले दर्शन

-----------------

### शारदीय नवरात्र महोत्सवाची उत्साहात सांगता







आरंभ मराठी । तुळजापूर

श्री तुळजाभवानी मातेच्या शारदीय नवरात्र महोत्सवातील कोजागिरी पौर्णिमेनिमित्त तब्बल दहा लाखापेक्षा जास्त भाविकांनी तुळजापूर येथे माथा टेकला. शारदीय नवरात्र महोत्सवात महत्त्वाचा दिवस असणाऱ्या कोजागिरी पौर्णिमेनिमित्त तुळजापुरातील सर्व रस्ते अक्षरशः भाविकांनी फुलून गेले होते. सोलापूर तुळजापूर रोडवर मंगळवारी संध्याकाळपासूनच पायी जाणाऱ्या भाविकांनी गर्दी केली होती. बुधवारी मध्यरात्रीनंतर या रोडवर दुतर्फा गर्दी दिसत होती. गुरुवारी दुपारी गर्दी ओसरल्यानंतर रस्ता मोकळा झाला होता. तसेच लातूर रोड, नळदुर्ग, धाराशीव रोड वरून देखील मोठ्या प्रमाणात भाविक तुळजापूर येथे दाखल झाले होते. पौर्णिमेनिमित्त पहाटे देवीजींची सिंहासनावर प्रतिष्ठापना करण्यात आली. तसेच रात्री सोलापूर येथील शिवलाड तेली समाजाच्या मानाच्या काठ्यांचा छबिना काढण्यात आला. त्यानंतर महंत तुकजी बुवा यांच्या जोगवा विधीने शारदीय नवरात्र महोत्सवाची सांगता करण्यात आली.

### परराज्यातील भाविकांची गर्दी

पौर्णिमेनिमित्त आंध्रप्रदेश, कर्नाटक व तेलंगणासह देशभरातून भाविकांनी तुळजापूर येथे मोठी गर्दी केली होती. अनेक भाविकांनी महाद्वार समोरूनच हात जोडून परतीचा प्रवास केला.

### १२०० एसटी बसचे नियोजन

कोजागिरी पौर्णिमेनिमित्त भाविकांची गर्दी लक्षात घेता एसटी महामंडळाने १२०० बसचे नियोजन केले होते. त्यामुळे भाविकांची सोय झाली. भाविकांच्या परतीच्या प्रवासासाठी एसटी बस उपलब्ध असल्यामुळे भाविकांचा परतीचा प्रवास देखील सुखकर झाल्याचे दिसून आले.

### आकर्षक फुलांची सजावट

कोजागिरी पौर्णिमेनिमित्त तुळजाभवानी मंदिरावर आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली होती. तसेच महाद्वार समोर देखील आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली होती. देवीजींच्या गाभाऱ्यात मोरपंखाची व फुलांची सजावट करण्यात आली होती.

# आधी अजित पवारांना,आता राष्ट्रवादीच्या उमेदवारांनाही भाजपकडून विरोध

## आमदार काळेंना उमेदवारी न देण्याची भाजपची मागणी

आरंभ मराठी । धाराशिव

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील वेगवेगळ्या मतदारसंघात गोंधळ सुरू झाला आहे. महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये जागा वाटप अद्याप निश्रि्चत नसले तरी घटक पक्षांतर्गत उमेदवारीला विरोध वाढू लागला आहे. अजित पवारांना महायुतीमध्ये घेतल्यापासून भाजपचा एक गट प्रचंड नाराज असतानाच आता विधानसभेसाठी इच्छूक अजित पवारांच्या राष्ट्रवादीतील उमेदवारांना भाजपचा विरोध वाढू लागला आहे. त्यामुळे महायुतीची घडी निवडणुकीत विस्कटणार की टिकणार, याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मराठवाडा शिक्षक मतदारसंघाचे आमदार विक्रम काळे काही दिवसांपासून धाराशिव-कळंब मतदारसंघात मतदारांच्या भेटीगाठी घेऊन कानोसा घेत आहेत. मात्र, त्यांच्या वाढलेल्या भेटीगाठींमुळे भाजपमध्ये अस्वस्थता पसरली आहे. राष्ट्रवादीने आमदार विक्रम काळे यांना उमेदवारी देऊ नये, अशी भूमिका घेतानाच भाजपने काळेंना उमेदवारी दिल्यास प्रखर विरोध करू, असा इशारा दिला आहे.



विधानसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडी किंवा महायुतीमध्ये अद्याप जागा वाटप निश्चित झालेले नाही. मात्र, काही इच्छूक उमेदवार आपल्यालाच उमेदवारी मिळणार, अशा मानसिकतेत कामाला लागले आहेत. काही उमेदवारांनी तिकीट नाही मिळाले तरी निवडणूक लढवण्याची भूमिका घेतली आहे. मात्र, काही उमेदवारांना पक्षांकडून वातावरण अनुकुल आहे का, याचा कानोसा घेण्यास सांगितले जात आहे. उमेदवारी मिळण्याच्या आशेने काही उमेदवार कामालाही लागले आहेत. धाराशिव-कळंब विधानसभा मतदारसंघाची जागा आपल्याच पक्षाला सुटावी, यासाठी शिवसेना, भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे स्थानिक नेते प्रयत्नशिल आहेत. अद्याप जागेबाबत निश्रि्चती नसली तरी शिवसेना पक्षाला ही जागा सुटण्याची दाट शक्यता आहे.मात्र, अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे मराठवाडा शिक्षक मतदारसंघाचे आमदार विक्रम काळे मतदारसंघात कानोसा घेत आहेत.मात्र, त्यांनाच उमेदवारी मिळेल, अशी शक्यता भाजप कार्यकर्त्यांना वाटत असल्याने आमदार काळेंचा विरोध केला जात आहे. आमदार काळेंना उमेदवारी देऊ नये, अशी जाहीर भूमिका भाजप पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी घेतली असून, गुरूवारी सायंकाळपासून समाजमाध्यमांवर आमदार काळेंच्या विरोधात पोस्ट व्हायरल होऊ लागल्या होत्या.त्यामुळे महायुतीत अजित पवारांना विरोध करणारा भाजपचा मोठा गट आता अजितदादांच्या उमेदवारांनाही विरोध करत असल्याचे दिसत आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात जिल्ह्यात अजित पवारांच्या पक्षासाठी सुटणाऱ्या कोणत्याही जागेसाठी भाजपचा विरोध होईल, असे दिसत आहे.

## तुळजापूर तालुक्यातील कात्री गावात बोगस मतदाराची नोंद झाल्याची तक्रार

आरंभ मराठी । तुळजापूर

तुळजापूर तालुक्यातील कात्री गावाच्या मतदार यादीत एक नाव बोगस असल्याचे निवेदन अमोल जाधव यांनी जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे दिले. तुळजापूर तालुक्यातील हंगरगा नळ येथे दोन दिवसांपूर्वी मतदार यादीतील काही बोगस नावे उघड झाली होती. त्यानंतर संपूर्ण जिल्ह्यात याबाबत खळबळ माजली होती. तुळजापूर विधानसभा मतदारसंघात या गोष्टीची जोरदार चर्चा सुरू आहे. जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे यांनी या प्रकरणाची तात्काळ दखल घेत गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानंतर आता कात्री या गावातील अभय सुधाकर रावळे हे नाव बोगस असल्याचे व त्याची पडताळणी करण्याची मागणी शिवसेना उबाठा गटाचे अमोल जाधव यांनी केली आहे. त्यामुळे आगामी काळात या यादीत आणखी किती नावे वाढणार तसेच या बोगस मतदान नावामध्ये सूत्रधार कोण हे देखील शोधणे गरजेचे बनले आहे. या प्रकरणावरून राजकीय पक्ष देखील आरोप प्रत्यारोप करत असल्याचे दिसत आहे.

# पोकरा योजनेतील दुसऱ्या टप्प्यात धाराशिव तालुक्यातील २४ गावांची निवड

## पोकरा योजनेमुळे शेती विकासाला मिळणार चालना

सुभाष कुलकर्णी । आरंभ मराठी

**तेर** : नानाजी देशमुख कृषी संजिवनी योजनेतील दुसऱ्या टप्प्यासाठी महाराष्ट्र शासनाने नुकत्याच जाहीर केलेल्या गावामध्ये धाराशिव तालुक्यातील २४ गावांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे तालुक्यातील २४ गावातील कृषी विकासाला चालना मिळणार आहे. या योजनेत अल्पभूधारक शेतकऱ्यांना हवामान बदलामुळे ओढावणाऱ्या परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी संशोधन, शेती उत्पादकता वाढविणे, पाण्याचा काटकसरीने वापर करण्यासाठी तुषार संच ठिबक संच वापर, शेतकऱ्यांनी उत्पादीत केलेल्या मालावर प्रक्रिया करून धान्य साठवणूक करण्यासाठी गोडावून उभारणे यावर प्रामुख्याने भर दिला जाणार आहे. पोकरा अंतर्गत तुषार संच, ठिबक संच पाईप, कुक्कुटपालन, विहीर पुर्नभरण, मत्स्यव्यवसाय, हरीतगृह उभारणे, गांडूळ खत निर्मिती, शेततळे बी.बी.एफ.पेरणी यंत्र, बांबू लागवड, वृक्ष लागवड, फळबाग लागवड या बाबींचा समावेश आहे. यासाठी शासनाकडून या योजनेसाठी मोठ्या प्रमाणात अनुदान मिळणार आहे.

### या २४ गावांची निवड

धाराशिव तालुक्यातील तेर, तडवळा, पळसप, उपळा या मोठ्या गावासह गोपाळवाडी, दुधगाव, खामगाव, खेड, घगरेवाडी, भिकारसारोळा, मोहतरवाडी, पानवाडी, जहागीरदारवाडी, शिंगोली,वरूडा, हिंगळजवाडी, डकवाडी, रामवाडी, कोळेवाडी, वाणेवाडी, इर्ला,भडाचीवाडी,आळणी,व कुमाळवाडी या २४ गावांची निवड पोकरा योजनेत करण्यात आली आहे.

### कृषी विकासातून प्रगती साधण्याचा प्रयत्न

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या माध्यमातून कृषी विकासातून आर्थिक प्रगती साधण्याचा प्रयत्न शासनाकडून केला जात आहे. पहिल्या टप्प्याला शेतकऱ्यांचा भरगोस प्रतिसाद मिळाला होता. त्यामुळे ही योजना आपल्या गावात यावी असे प्रत्येक शेतकऱ्याला वाटत होते. या योजनेत शेतकऱ्यांना भरपूर सवलती दिल्या जातात. शेतकऱ्यांना काही शेती विषयक निगडित आर्थिक मदत करून प्रगतशील बनवण्यासाठी शासनाचा प्रयत्न आहे.

# नामनिर्देशन पत्र दाखल करताना पाच व्यक्तींनाच प्रवेश, ३ वाहनांचा ताफा

## निवडणूक विभागाकडून उमेदवारांसाठी कार्यपध्दती निश्चित

आरंभ मराठी । धाराशिव


निवडणूक कालावधीत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात उमेदवारांनी नामनिर्देशन पत्र दाखल करताना निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात वाहनांच्या ताफ्यामध्ये तीनपेक्षा जास्त मोटारगाड्या,मोटारसायकल,वाहने यांचा समावेश नसावा तसेच नामनिर्देशन पत्र दाखल करतेवेळी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या दालनात केवळ पाच व्यक्ती उपस्थित राहतील. नामनिर्देशनपत्र दाखल करताना कार्यालयाच्या परिसरात मिरवणूक, सभा घेता येणार नाही तसेच कोणत्याही प्रकारच्या घोषणा, वाद्य वाजविता येणार नाही, अशी नियमावली निश्रि्चत करण्यात आली आहे.

महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा कार्यक्रम घोषित करण्यात आला आहे.१५ ऑक्टोबरपासून जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे.जिल्ह्यातील विधानसभा निवडणूकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत,निर्भय व न्याय्य वातावरणात पार पाडण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात उमेदवारांनी नामनिर्देशन पत्र दाखल करतेवेळी अवलंब करण्याची कार्यपध्दती निश्रि्चत करण्यात आली आहे. उमेदवारांनी नामनिर्देशनपत्र दाखल करते वेळेस निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयाचे १०० मीटर परिसरात तसेच दालनात पाच व्यतिरिक्त कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही.जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांना प्रदान करण्यात आलेल्या (फौजदारी प्रक्रीया संहिता १९७३ चे कलम १४४) भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये देण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन त्यांनी हा आदेश निर्गमित केला आहे. हा आदेश १५ ऑक्टोबर ते २५ नोव्हेंबरपर्यंत अंमलात राहणार असल्याचे जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओम्बासे यांनी कळविले आहे.

## भारत - कॅनडा तणावाला ट्रूडोच जबाबदार

कॅनडा आणि भारताचे संबंध कमालीचे तणावग्रस्त बनले आहेत. कॅनडाचे पंतप्रधान जस्टीन ट्रूडो यांनी खलिस्तान फुटीरतावादी नेते हरदीपसिंग निज्जर याच्या हत्येत भारतीय गुप्तचर यंत्रणेचा हात असल्याचा आरोप केला इतकेच नाही तर भारतीय दूतावासातील उच्चायुक्त संजय कुमार वर्मा यांचा या हत्येशी थेट संबंध जोडण्याचा प्रयत्न केला. कॅनडातील एकंदर परिस्थिती पाहून भारताने कॅनडा मधील आपल्या अधिकाऱ्यांना माघारी बोलावून नवी दिल्लीतील कॅनडाच्या उच्चायुक्त कार्यालयातील सहा अधिकाऱ्यांची हकालपट्टी केली. कॅनडाने मागील वर्षीच हरदिपसिंग निज्जर याचा हत्येत भारताचा हात असल्याचा आरोप केला होता तेंव्हाच हरदीपसिंग निज्जर याच्या हत्येमागे भारताचा कोणताही हात नाही असे भारतीय परराष्ट्र खात्याने सांगितले होते त्यानंतर काही काळ गप्प बसलेल्या ट्रूडो यांनी पुन्हा तीच खेळी करत नव्हे त्याही पेक्षा पुढची खेळी करीत ही कारवाई केली. कॅनडाच्या या कारवाई नंतर भारतानेही कॅनडाच्या सहा वरिष्ठ अधिकाऱ्याची हकालपट्टी करून जशास तसे उत्तर दिले. या घटनेनंतर दोन्ही देशातील तणाव कमालीचा वाढला आहे आणि याला सर्वस्वी कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रूडो हेच जबाबदार आहे. खलिस्तान या फुटीरतावादी संघटनेवर भारताने बंदी घातली आहे मात्र कॅनडा या देशाने खलिस्तानला कायम समर्थन दिले आहे. याच संघटनेने भारताच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची हत्या घडवून आणली आहे. भारतापासून अलग होऊन स्वतंत्र खलिस्तान राष्ट्र निर्माण करणे हे या संघटनेचे ध्येय आहे. १९८० च्या दशकात ही संघटना खूप आक्रमक होती. ही संघटना भारताच्या सार्वभौमत्वाला आव्हान देत आहे म्हणून भारताने तिच्यावर बंदी घातली मात्र आजही या फुटीरतावादी संघटनेचे काम चालूच आहे. या संघटनेला परदेशातून विशेषतः कॅनडा या देशातून आर्थिक आणि सामरिक मदत मिळते. १९८० च्या दशकात जेंव्हा खलिस्तान चळवळ जोमात होती तेंव्हा पासूनच कॅनडामधून त्यांना आर्थिक रसद पुरवली जात होती. आज ४० वर्षानंतही परिस्थिती बदलली नाही. आजही कॅनडा सरकार खलिस्तानचे उघड समर्थन करत आहे. कॅनडाचे पंतप्रधान जस्टीन ट्रूडो हे खुलेआम खलिस्तानवादयांचे समर्थन करत आहेत. त्यांच्या मंत्रिमंडळात खलिस्तान समर्थक मंत्र्यांचा समावेश आहे. अमृतपाल सिंग या खलिस्तानी अतिरेक्याला भारताने अटक केल्यावर विदेशातील खलिस्तान समर्थक कॅनडामध्ये एकवटले आहेत. कॅनडामध्ये भारतविरोधी कारवाया पाहून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्रूडो यांना भारतविरोधी खलिस्तानवाद्यांवर कारवाई करण्याची मागणी केली परंतु ट्रूडो यांनी पंतप्रधानांच्या मागणीकडे दुर्लक्ष केले. एव्हढेच नाही तर मागील वर्षी टोरोंटो आणि ओंटोरिया या शहरात खालसा स्थापना दिनाच्या कार्यक्रमाला त्यांनी हजेरी लावली. तिथे त्यांचे खलिस्तानचा ध्वज देऊन स्वागत करण्यात आले. ट्रूडो यांच्या या भूमिकेचा भारत सरकारने तीव्र शब्दात निषेध केला मात्र भारताच्या निषेधाकडे ट्रूडो यांनी दुर्लक्ष करत खलिस्तानला समर्थन देणे चालूच ठेवले. ट्रूडो यांची खलिस्तानवाद्यांना समर्थन देण्याची फुटीरतावादी भूमिका म्हणजे भारतविरोधी शत्रुत्वाची भावना आहे. वास्तविक भारताने कॅनडासोबत कायम मित्रत्वाचे संबंध ठेवले आहे. भारत कॅनडाला मित्रच मानतो मात्र कॅनडा फुटीरतावाद्यांना पाठबळ देत आहे त्यामुळे भारताने याची गंभीरपणे नोंद घेऊन कॅनडाला खडसावले. त्यामुळेच जस्टीन ट्रूडो यांनी हरदीपसिंग निज्जर याच्या हत्येचे भांडवल करून भारताशी पंगा घेतला आहे. अर्थात कॅनडा हे एकट्याच्या जोरावर करत नाही हे उघड आहे कॅनडाला काही देशांचा छुपा पाठिंबा आहे. पाकिस्ताननेही या वादात उडी घेऊन कॅनडा ला पाठिंबा दिला आहे. सातत्याने हा वाद उकरून कढण्यामागे जस्टिन ट्रूडो यांचा राजकीय स्वार्थ आहे पुढील वर्षी कॅनडात निवडणुका होणार असून ट्रूडो हे पुन्हा निवडणुकीस उभे राहणार आहे. मात्र परिस्थिती त्यांना अनुकूल नाही. बेरोजगारी, महागाई यामुळे त्यांच्या विषयी तेथील नागरिकात प्रचंड नाराजी आहे निवडणूक पूर्व सर्व्हे क्षणात त्यांच्या पक्षाची पिछेहाट दिसत आहे त्यामुळे कॅनडात असलेल्या साडे सात लाख शीख नागरिकांची मते आपल्या बाजूने वळावित यासाठी त्यांनी पुन्हा हा वाद उकरून काढला आहे. वास्तविक या हत्येमागे भारताचा हात नाही असे भारताने स्पष्ट केले असतानाही ट्रूडो यावरून भारताशी वारंवार वाद उकरून काढत आहे. वास्तविक खलिस्तान ही फुटीरतावादी संघटना आहे ती भारताच्या सार्वभौमत्वाला आव्हान देते आहे. भारताच्या सार्वभौमत्वाला आव्हान देणारे किंवा फुटीरतावाद्यांना पाठबळ देणारे आमचे मित्र होऊ शकत नाही असे भारताने कॅनडाला ठणकावून सांगायला हवे. जोवर कॅनडा फुटीरतावाद्याना समर्थन आणि पाठबळ देणे थांबवत नाही तोवर दोन्ही देशातील संबंध पूर्ववत होणार नाही अशी भारताने ठोस भूमिका भारताने घ्यायला हवी इतकेच नाही तर आंतरराष्ट्रीय स्तरावर देखील हा मुद्दा उचलून धरायला हवा.

# जातीपाती विरहित समाज असावा–महात्मा बसवेश्वर



बाराव्या शतकाच्या मध्य काळात समाजात विविध धर्म,जाती,रूढी यांनी आपलं जाळं पसरलं होतं. कर्मकांडाचे स्तोम माजलेलं होतं. चातूर्वर्ण ही कर्मसोय न राहता धर्मसोय झाली होती.भारतीय संस्कृती अतिप्राचीन मानली जाते.इथं जन्म घेणाऱ्याला जन्माबरोबरच संस्कारच बाळकडू मिळतं. परंपरेतून मिळालेली ऊर्जा त्याला आयुष्य भर पुरते. इथल्या सामाजिक प्रगतीच्या कक्षा – व्याप्ती मर्यादेपलीकडे जात नाही.वैचारिक वादळे काही काळ घोंगवतात आणि पुन्हा स्थिर होतात. महात्मा बसवेश्वर यांचे कार्य मात्र मर्यादेच्या कक्षा ओलांडणार होत. त्यांनी आपल्या प्रभावी कार्याने सामाजिक चौकटीला छेद दिला. समाज अभ्यासकांनी एकमुखाने त्यांना क्रांतीचा अग्रदूत मानलं ते उगीच नव्हे.म, बसवेश्वरांचे दृष्टिपण पुढील समाजानं अनुभवलेलं आहे.उपेक्षितांच्या पदरात सामाजिक न्याय त्यांचा हक्क मानून टाकण्याचं मोलाचं कार्य महात्मा बसवेश्र्वरांनी केलं.

म. बसवेश्वरांची सामाजिक प्रतिबद्धता उपजत होती वयाच्या आठव्या वर्षी उपनयन संस्काराला विरोध करणारे ते एकमेव होते. म. बसवेश्वर यांना राख फासून जंगलात जायचं नव्हतं, समाज ऋणातून मुक्त होण्याकरता समाजात राहणं आवश्यक होतं हे त्यांना माहीत होतं. म. बसवेश्वरांनी चातूर्वणाला संपावण्यासाठी जीवापाड कष्ट घेतले. त्यांनी लोक संपर्काला प्राधान्य दिले. अस्पृश्यांच्या घराचं भोजन हा त्यांच्याकरीता खरा ईश्वरप्रसाद होता. तळा.. गळत जाऊन त्यांना व्यवसायाभिमुख करण्याचा म. बसवेश्वरांनी चंगच बांधला होता. बसवण्णा चे अस्पृश्य प्रेम त्याकाळातील हाती घेतलेले कार्य निष्ठेने पार पाडताना बसवेश्वरांनी कधीही कुचराई केली नाही की,तडजोड स्वीकारली नाही. बसवण्णा दीन दलितांच्या घरी जात त्यांना बरोबरीने वागवत त्याचं अन्न ग्रहण करतात अशा तक्रारी बसवण्णा यांना ऐकू येत होत्या. परंतू कानावर पडणाऱ्या निंदेपेक्षा अंतर्मनात निनादणारे विचार त्यांना अधिक महत्त्वाचे वाटत असतं.म. बसवेश्वरांनी आपल्या प्रांजळ वैचारिक प्रबोधनाने समाजमन आपलंसं केले.समाज बसवेश्र्वरांच्या समता चिंतनाने प्रभावित झाला.

मंगळवेढातील म. बसवेश्वर यांचे वास्तव्य प्रदीर्घ होते.तारुण्यातील एकवीस वर्षाचा कालखंड म, बसवेश्वरांनी सत्कारणी लावला.जातीभेद संपले पाहिजेत.जातिविरहित समाज रचनेचा विचार म, बसवेश्वरांनी दिला. माणूस जन्माने नव्हे, कर्माने ओळखला जातो. कुणी कोणतेही काम करत असो. त्याच्यात उच्च निचातेचा भाव असू शकत नाही. स्त्री पुरुष भेद ही संपवला गेला. स्त्रीलाही लिंग धारणेचा व पूजेचा अधिकार दिला गेला. महात्मा बसवेश्वरांनी आंतरजातीय विवाहास मान्यता दिली.समतेच्या या अद्भुत क्रांतीला १२ व्या शतकात प्रत्यक्ष जन्म देणाऱ्या बसवेश्वरांचे दृष्टी पणा नाकारता येणार नाही. 'वसुधैव कुटुंबकम' हे सुभाषित अवतरण्याकरिता पृथ्वीतलावरील जात ' नष्ट झाली पाहिजे. समतेचे मंदिर उभं राहण्यासाठी जातीपाती विरहित समाजाचा उदय होणं आवश्यक आहे. हे म. बसवेश्वरांनी स्वप्न उरी बाळगले आणि जागवले,ते सत्यात उतारावं म्हणून प्राण चं मोलही दिले. कायकवे कैलास हे म. बसवेश्वरांचे ब्रीद वचन होतं.कायक अर्थात निष्ठेने कर्म करणं.जीवनात कर्मयोगाला फार महत्त्व दिलं पाहिजे असे महात्मा बसवेश्वर म्हणतं.

स्त्री मुक्ती समता स्त्री मुक्ती हा फक्त उच्चारच होता आणि आहे. प्रत्यक्षात स्त्रीयांच्या बाबतीत ' स्वातंत्र कुठे ? स्वातंत्र्य कधी ' अशी प्रत्यक्ष स्थिती आहे. स्त्री सहभगापेक्षा, स्त्री सहवासच समाजात रूढ आहे. उपेक्षे करिताच स्त्री जन्म आहे की काय? बालपणी पित्याचा आश्रय,तरुणपणी पतीचा आश्रय आणि वृद्धावस्थेत पुत्राच्या आश्रयात स्त्री जीवन संपते. आश्रीताचे लाजिरवाणे जिणेच तिच्या वाट्याला येते. तिच्या बाबतीत परावलंबित्वला जणू पर्यायच नाही. २१ शतकात स्त्री मुक्ती हे केवळ अवडंबर ठरले आहे. मात्र १२ व्या शतकात महात्मा बसवेश्वर यांनी स्त्री मुक्तीचे चित्र रेखाटले होते. ही आश्चर्य कारक घटना प्रत्यक्षात साकार केली होती. शरणांच्या बरोबरीने स्त्रीला स्थान प्राप्त होते. ईश्वर उपासना,कायक विज्ञार्जन ,सामाजिक जीवन यात स्त्रीला समान वागणूक होती.सामाजिक सुधारणेचा हा सुवर्णकाळ वीरशैव समाजानी प्रत्यक्ष अनुभवला. तत्कालीन समाज व्यवस्थेने तो डोळे फाडून पाहिला. नाक मुरडणाऱ्यानी नाक मुरडली, कपाळाला आठ्या घातल्या, विरोधात कंठ शोष केला.परंतु महात्मा बसवेश्वर व त्यांच्या अनुययांनी स्त्रियांना समाज जीवनात बरोबरीचे स्थान दिले. म. बसवेश्वर यांच्या काळात स्त्री पुरुष समता ही केवळ उक्ती न राहता ते सामाजिक सत्य झाले होते. स्त्री उद्धराच्या इतिहासात महात्मा बसवेश्वर यांना तोड नाही.



**सोमनाथ बेलुरे**
उस्मानाबाद (धाराशिव)
९८५००३६६४६

महात्मा बसवेश्वर यांचे कार्य खूप मोठे आहे. कार्य सिद्दी साठी दोन हात पुरेसे नव्हते. केवळ राजाश्रय आणि धनसंचय उपयोगी नव्हता.मानव आचारात क्रांती करू पाहणाऱ्या जाणत्या बसवेश्वरांना समजून घेऊन त्यांच्यासोबत स्वतः ला समर्पित करणारे अनेक अनुयायी होते. बसव क्रांतीच्या या यज्ञात अनेकांनी आपल्या त्यागाच्या समिधाही अर्पण केल्या. आचारविचारा करिता केवळ वचने व अक्षरनोंद न करता एकानिष्ठेने कार्यधुरा स्वीकारून स्वतः ला पूर्ण समर्पित करणारे हे सगे अनुयायी इतिहासाला विसरता येणार नाहीत. प्रसिध्दीपासून दूर राहून मोहाचा किंचितही विचार न करता रक्तनात्याला स्वार्थाला मूठमाती देऊन सर्वस्व पणाला लावणारे हे म. बसवेश्वर यांचे अनुयायी ,सोबती छत्रपतींच्या सहकाऱ्यासारखे होते. बसव विचारांचा महिमा असा की,त्या विचाराने प्रभावित होऊन लोकांनी आपला धर्म टाकला,परंपरा मोडीत काढल्या. जन्मापासून च्या संस्कारांना मूठमाती दिली. हे करत असताना त्यांनी सर्व जुन्या शृंखला तोडून टाकल्या. त्यांच्यात कोणी धोबी,कोणी चांभार, कुणी उच्च कुलीन होते. म, बसवेश्वरांनी त्यांना कोणतेही प्रलोभन दाखवलं नाही. माणसांना खऱ्या माणुसकी करिता सुसंस्कराच आवाहन केलं होतं. महात्मा बसवेश्र्वर यांचे सामाजिक,धार्मिक विचार अत्यंत साधे सरळ आहेत. प्रपंच,–परमार्थ,जीव–शिव, ज्ञान, क्रिया, योग भोग, परंपरा – प्रगती,उच्च नीच, श्रीमंत – गरीब स्त्री – पुरुष ,पंडित – पामार यांच्यातील द्वंद त्यांनी काढून टाकले होते. महात्मा बसवेश्वरांमध्ये बुद्धांची करुणा, ख्रिस्ताचे 'जीवन प्रेम', इस्लामची शांती, वैदिकांचे ' सात्विक दर्शन ' आढळते. बौध्द, जैन, इस्लाम, ख्रिस्त यांना नंतर जसे अनुयायी मिळाले तसे अनुयायी मात्र म. बसवेश्वर यांना मिळाले नाहीत. हे दुर्दैव आहे. त्यामुळे त्यांचा संदेश ,विचार सुदूर चोहीकडे पोहोचू शकला नाही. १२ व्या शतकात क्रांतीसुर्य महात्मा बसवेश्वर यांनी समतेची पताका अटकेपार फडकावली. म्हणून त्यांचे पुतळे ब्रिटन,रशिया अशा जगातील प्रगत देशात उभे राहिले आहेत. स्पृश्य – अस्पृश्य विविध जाती – जमाती, दलित शोषित पीडित, स्त्री –पुरुष, आबालवृद्ध , शिक्षित – अशिक्षित यांनी महात्मा बसवेश्वरांना प्रचंड प्रतिसाद देण्याचा ऐतिहासिक प्रसंग १२ व्या शतकानं आश्चर्याने पाहिला होता. ही अद्भुत क्रांतीच एवढी प्रभावी होती की,आज ही लोक स्मिमित होतात.जे घडले ते अखिल मानव जाती करिता उद्धारक आणि प्रेरक आहे. समता विश्व कल्याणाची शक्ती आहे. समतेतून मानव प्रगती होऊ शकते हे सर्वमान्य जीवनमूल्ये आता सिद्धच झाले आहे.भेद संपवण्याचा वेध घेणाऱ्या महात्मा बसवेश्वर यांच्या विचारांचं स्वागत होतंय. महात्मा बसवेश्वर यांचे आंदोलन हे बहुजन समाजाची गण व्यवस्था पूर्नस्थापित करण्यासाठी होते.हे लक्षात घ्यावे लागेल.त्याशिवाय वचन साहित्याचा ,सामाजिक सांस्कृतीचा संदर्भ कळत नाही तो पर्यंत सहा हजार जातीत विभाजित झालेला समाज जोडता येत नाही. अतिप्राचीन भारतात झालेला बळीवंशाचा संघर्ष,प्राचीन भारतातील बुद्धांची सामाजिक क्रांति, महात्मा बसवेश्वरांचे जातीपाती विरहित समाज आंदोलन, वारकरी संताचे आंदोलन, महात्मा फुलेंचे सत्यशोधक आंदोलन, राजर्षी शाहू महाराज यांचा वैदोक्त संघर्ष,डॉ, बाबासाहेब आंबेडकर यांचा प्रतिनिधित्व साठी आणि संविधान निर्मिती करिता केलेला संघर्ष, अठरा विश्व दारिद्र्यात राहून अण्णाभाऊ साठे यांनी केलेली साहित्य संपदा या सर्वांचा शोध घेतला तर लक्षात येते की, या सर्वांच्या संघर्षात कार्यरत असलेली शक्ती म्हणजे विचारधारा – तत्त्वज्ञान समान आहे.विचारधारा हे समाज तोडण्याचे तसेच जोडण्याचे रसायन आहे. या सर्व महात्म्यांनी जातीपाती विरहित समाज निर्माण करण्यासाठी जो संघर्ष केला त्या सर्वांना माझा विनम्र प्रणाम – अभिवादन.....

# शहरातील रस्त्यांच्या दुर्दशेवरून तरुणांचे गांधीगिरी पद्धतीने आंदोलन

**आरंभ मराठी । धाराशिव**

धाराशिव शहरातील रस्त्याच्या दुर्दशेवरून दोन तरुणांनी गुरुवार (दि.१७) रोजी फलक घेऊन खड्ड्यात उभे राहत गांधीगिरी पद्धतीने आंदोलन करून लोकांचे लक्ष वेधून घेतले. 'या खड्ड्यात आपण पडून मेलात तरी चालेल, पण हा रस्ता असाच राहणार' असा फलक घेऊन या तरुणांनी दिवसभर लेडीज क्लब ते राजमाता जिजाऊ चौक या रस्त्यावरील ठिकठिकाणी पडलेल्या मोठ्या खड्ड्यांमध्ये रस्त्याच्या मधोमध उभे राहत वाहन चालकांचे लक्ष वेधून घेतले. धाराशिव शहरातील अक्षय सरवदे आणि आदित्य कुलकर्णी या दोन तरुणांनी हे आगळेवेगळे आंदोलन केले. शहरातील सर्वच रस्त्याची अवस्था बिकट झाली असून, महिला, वृद्ध तसेच शालेय विद्यार्थ्यांना रस्त्यावरून प्रवास करताना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. प्रशासनाला आणि राजकीय नेत्यांना शहराची ही बकाल अवस्था दिसत असूनही त्यांच्याकडून काहीच केले जात नाही, त्यामुळे उद्विग्न होऊन हे आंदोलन केल्याचे आंदोलन करणाऱ्या अक्षय सरवदे यांनी सांगितले. यावेळी रस्त्यावरून जाणाऱ्या वाहन चालकांनी त्यांच्या या आंदोलनाची दखल घेत आंदोलनाला पाठींबा दर्शवला.




## कालचक्र

मुलींच्या आईचा आज,
रुबाब फारच वाढलाय.
मागच्या पिढीचा म्हणे,
वचपा आम्ही काढलाय.

पोरगी माझी सुन कर म्हणून ,
विनंती करायची भावाला.
पण घाम नाही फुटला ,
तिच्या श्रीमंत भावाला.

पदरात भाकरी बांधून भाऊ ,
आपल्या बहीणीकडे जायचा.
माझाच हुंडा राहिला म्हणत ,
मेव्हुणा नको नको ते बोलाचा.

नियतीची ही काळ चक्रे ,
कशी उलट्या दिशेने फिरली.
हुंड्यासाठी हटून बसणाऱ्या,
साऱ्या आई बापांची जिरली .

बदला घेण्याच्या नादात,
पोरं पोरी उपवर झाले.
तारुण्य त्यांचे हिरावून घेवून ,
आपण काय साध्य केले.

जातपात देवक कुळाचा,
भेदभाव आता नका धरू.
स्वातंत्र्य समता बंधुता हा,
सुखाचा मार्ग अनुसरू.



**गोकुळ गायकवाड**
जामखेड: ९४२३१८३८२२

## मानाच्या काठ्यांचे तुळजापूरमध्ये स्वागत



**आरंभ मराठी । तुळजापूर**

कोजागिरी पौर्णिमेनिमित्त सोलापूर शिवलाड समाजाच्या मानाच्या काठ्यांचे आगमन गुरुवारी तुळजापूर शहरात झाले. तुळजाभवानी मातेचे मुख्य भोपे पुजारी संभाजी शहाजी कदम पाटील व सचीन प्रकाशराव कदम पाटील यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी मानकरी ऋषी मंटाळकर, संतोष गावडकर, श्री जगदंबा मंदिर सोलापूर मानकरी अर्जुन मंटाळकर, अमित मंटाळकर, केशव सोनसाळे यांच्यासह पुजारी व नागरिक उपस्थित होते.

# नारंगवाडी येथे महर्षी वाल्मिकी जयंती साजरी

**आरंभ मराठी । नारंगवाडी**

उमरगा तालुक्यातील नारंगवाडी येथे रामायणाचे रचते तसेच संस्कृत, ज्योतिष आणि खगोलशास्त्राचे सखोल अभ्यासक महर्षी वाल्मिकी यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. महर्षी वाल्मिकी यांच्या प्रतिमेचे पूजन नारंगवाडी गावचे सरपंच शेखर घंटे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. सर्वांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. शेखर घंटे यांनी महर्षी वाल्मिकी यांच्या जीवन चरित्राची माहिती सांगितली. या कार्यक्रमाला उपसरपंच कुमार पवार, दिलीप घंटे, किसन भारती, नागेश घंटे तसेच महिला वर्ग, तरुण वर्ग, लहान मुले मोठ्या उत्साहात सहभागी झाली होती.



## काटी सारोळे येथील हणमंत गाटे यांचे निधन



**आरंभ मराठी । काटी**

काटी ग्रामपंचायतचे सरपंच सुजित हंगरगेकर यांचे मामा व काटी सारोळे येथील व्यवसायिक तथा प्रगतशील शेतकरी हणमंत शंकर गाटे(वय ५४ वर्षे)यांचे बुधवार दि.१६ रोजी रात्री ७.३० वाजता हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सारोळे ता.बार्शी येथे गुरुवार दि १७ रोजी सकाळी १०.३० वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, तीन भाऊ, भावजय, पुतणे असा मोठा परिवार आहे.

# मुरुम शहरातील कवी, शायर, गायकांनी गाजवली काव्यमैफिल

## कोजागिरी पौर्णिमेच्या चंद्रदर्शनात रसिकांनी घेतला कविता व गीतांचा आनंद

**आरंभ मराठी । मुरूम**

येथील बसव सहकार भवनमध्ये कोजागिरी पौर्णिमेचे औचित्य साधून श्री महात्मा बसवेश्र्वर नागरी सहकारी पतसंस्था, महात्मा बसवेश्र्वर सार्वजनिक ग्रंथालय व रोटरी क्लब मुरूम सिटी यांच्या सयुक्त विद्यमाने बुधवारी (ता. १६) रोजी कोजागिरी काव्य मैफिलचे आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य दत्तात्रय इंगळे होते. यावेळी पतसंस्थेचे चेअरमन शिवशरण वरनाळे, रोटरीचे अध्यक्ष कमलाकर मोटे, सचिव सुनील राठोड, रोटरीचे माजी अध्यक्ष डॉ. नितीन डागा, डॉ. सुवर्णा पाटील आदींची प्रमुख




उपस्थिती होती. विविध घटना, प्रसंग, वास्तव जीवनावर आधारित यावेळी कविवर्य सहशिक्षक रुपचंद ख्याडे यांनी संवेदना.....

कसे सांगावे दुःख सारे, कशा व्यक्त करू वेदना, माणसासाठी माणसाला, उरल्या नाही संवेदना , सहशिक्षक नागनाथ बदोले यांनी वंदन माह्या माय मराठीला, अभिमान माझ्या या मराठी मातीला..., शिवशरण वरनाळे यांनी दगडाचा देव मानवा तू शोधलास दगडात देव..., कलाप्पा पाटील यांनी सोयासिस चातक मी उडत आलो तुझ्या किनाऱ्या काठी जल पिण्या गुलाबी ओठी..., विजयकुमार देशमाने यांनी विझवून आज रात्री कृत्रिम दीप सारे, गगनात हसणारा तो चंद्रमा पहा रे..., मारोती बोडरे यांनी माय माझी शेतात राबत जाई अजूनही नाही सुटल तिच्या पाठीच खुरप ग बाई , तत्रस्नेही सहशिक्षक सुनील राठोड यांनी ऋतू मागून ऋत नवे, दिसामागून दिस नवे..., हुसेन नुरसे यांनी महंमद रफी यांचे गीत, पत्रकार मोहन जाधव यांनी विद्रोही शेरो–शायरींनी सभागृहात रंजकता वाढवली, पत्रकार अजिंक्य मुरुमकर यांनी हॅपी पिरियड्स डे...., उपप्राचार्य कलय्या स्वामी, प्रकाश रोडगे, गुंडेराव गुरव यांनी कविता सादर करुन श्रोत्यांची मने जिंकली. याप्रसंगी आनंद बिराजदार, सेवानिवृत्त मुख्याध्यापक काशिनाथ निर्मळे, प्रा. शिवाजी राठोड, प्रा. राजकुमार वाकडे, मल्लीनाथ बदोले, संचालक अशोक जाधव, अमृत वरनाळे आदिंची विशेष उपस्थिती होती. डॉ. सुवर्णा पाटील व प्रा. डॉ. महेश मोटे यांनी मनोगत व्यक्त केले. दत्तात्रय इंगळे यांनी अध्यक्षीय समारोप करताना म्हणाले की, कविवर्यांनी सादर केलेल्या कवितेमागे एक विशिष्ट भावना, अनुभव व विचार असतो. कवितेतील शब्द, प्रतीकं आणि रूपकं यांचा वापर करून कवी त्या भावनांना व्यक्त करत असतो. शाखाधिकारी दत्तात्रय कांबळे, चिदानंद स्वामी, प्रशांत काशेट्टी, धीरज मुदकण्णा, सचिन कंटेकूरे, राजू मुदकण्णा, महांतय्या स्वामी, संतोष मुदकण्णा आदींनी पुढाकार घेतला. या काव्य मैफिलचे प्रास्ताविक संतोष कांबळे यांनी केले. सूत्रसंचालन सहशिक्षक बालाजी भोसले तर आभार प्रा. डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी यांनी मानले.

# डोमगाव येथील बोगस रेशनकार्ड धारकांवर कायदेशीर कारवाई करा

## चौघांनी उपोषण करत केली तहसीलदारांकडे मागणी

**आरंभ मराठी । परंडा**


परंडा तालुक्यातील डोमगाव येथील बोगस रेशनकार्ड धारकांवर गुन्हा दाखल करावा या मागणीसाठी येथील चार नागरिकांनी परंडा तहसिल कार्यालयासमोर दिनांक १५ ऑक्टोबर पासून उपोषण सुरु केले असुन उपोषणाचे तीन दिवस झाले आहेत. परंडा तालुक्यातील डोमगाव येथील बोगस रेशनकार्ड प्रकरणी तक्रार केल्यानंतर चौकशीत बोगस रेशनकार्ड असल्याचे तपासात निष्पन्न झाले होते. त्यानंतर त्यांच्यावर पोलिसात गुन्हा दाखल करण्याची डोमगाव येथील दिपक उमराव गायकवाड,अनिल अर्जुन गायकवाड,लक्ष्मण देविदास गायकवाड,माधव प्रभाकर दाभाडे या चौघांनी मागणी केली असून, चार जणांनी परंडा तहसिल कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. गुरुवारी उपोषणाचा तिसरा दिवस होता. जोपर्यंत गुन्हा दाखल होणार नाही तोपर्यंत उपोषण सुरू ठेवणार असल्याचे उपोषणकर्त्यांनी सांगितले. या प्रकरणात डोमगाव येथील बोगस कार्ड धारकांनी बोगस रेशनकार्ड काढुन गावातील राजकीय नेत्याच्या सहकार्याने रमाई घरकुल योजनेतुन घरकुल घेऊन शासनाची फसवणूक केली असल्याची तक्रार उपोषणकर्त्यानी निवेदनाद्वारे केली आहे. त्या लाभार्थ्यांनी यापुर्वी देखील घरकुलाचा लाभ घेतला असुन, दुबार घरकुलाचा लाभ




घेण्यासाठी गावातील एका राजकीय पुढार्याला हाताशी धरून शासनास फसवून बनावट रेशन कार्ड काढले व गावातील पुढाऱ्याला हाताशी धरून घरकुल मिळवले आहे. गावात अनुसुचीत जातीचे अनेक लाभार्थी असुन त्यांना डावलुन संबंधीत बोगस रेशनकार्ड धारकांना घरकुल दिले असल्याचे उपोषण कर्त्यांनी निवेदनात म्हटले आहे. या प्रकरणी ज्यांनी लाभ घेतले आहेत त्यांच्यावर व शासनाची फसवणूक करणा –यावर कारवाई झाल्या शिवाय उपोषण मागे घेणार नसल्याचे उपोषणकर्ते दिपक गायकवाड यांनी संगितले.

## विविध वृत्त...

### महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या सदस्यपदी सुशीलकुमार तिर्थकर यांची निवड



**आरंभ मराठी । कळंब**

ज्ञान प्रसारक मंडळ येरमाळा संचलित विद्याभवन हायस्कूल कळंब प्रशालेतील सामाजिक शास्त्र विषयाचे जेष्ठ शिक्षक सुशीलकुमार सुधाकरराव तिर्थकर यांची महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, लातूर येथे महाराष्ट्र शासनाच्या वतीने अशासकीय सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे. त्याबद्दल ज्ञान प्रसारक मंडळ येरमाळा संस्थेचे सचिव डॉ. अशोकराव मोहेकर, विद्याभवन हायस्कूल कळंबचे मुख्याध्यापक पवार व्ही. एस, उपमुख्याध्यापक कुंभार व्ही.जी, पर्यवेक्षक विक्रम मायाचारी यांच्या हस्ते प्रशालेत त्यांचा सत्कार करण्यात आला.

सुशीलकुमार तीर्थकर यांनी प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम आराखडा २०१२ मध्ये भूगोल अभ्यासक्रम विकसन समिती सदस्य म्हणून, तसेच महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व संशोधन मंडळ पुणे, भूगोल अभ्यास समिती सदस्य २०१३ या शासकीय समितीवर यापूर्वी कार्यरत राहिलेले आहेत. त्यांच्या या शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात असलेल्या सक्रिय कार्यातून, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, लातूर विभागीय मंडळावर शिक्षक (माध्यमिक) संवर्गातून अशासकीय सदस्य पदी नियुक्ती करण्यात आली आहे. यावेळी ज्ञान प्रसारक मंडळ येरमाळा संस्थेचे अध्यक्ष अनिल बापू मोहेकर, उपाध्यक्ष प्रा. आबासाहेब बारकुल आदींसह शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी व पालक वर्गातूनही कौतुक होत आहे. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनोद सागर, तर आभार ज्योतीराम सोनके यांनी मानले.

### मुरुम येथील डॉ.आंबेडकर वाचनालयाच्या वतीने जि.प. स्पेशल शाळेत वाचन प्रेरणा दिन साजरा



**आरंभ मराठी । मुरूम**

मुरुम येथे १५ ऑक्टोबर रोजी स्पेशल जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मुरूम येथे वाचन प्रेरणा दिन ग्रंथ प्रदर्शन करून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी साजरा केला जातो, ज्याचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड आणि ज्ञानाची उपासना वाढवणे आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक प्रमिला तुपेरे या होत्या. तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. आंबेडकर वाचनालयचे सहसचिव महेंद्र कुमार कांबळे हे होते. यांच्या हस्ते सर्वप्रथम डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यानंतर सह शिक्षक रुपचंद ख्याडे व रेणुका कुलकर्णी यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुस्तकासंबंधी प्रेम व त्यांचे वाचन याविषयी विद्यार्थ्यांना त्यांचे जीवनपट आपल्या भाषणातून व्यक्त केला. यावेळी सहशिक्षक अभिजित कांबळे, मंगल कचले, सुनिता मिरगाळे, शिवाजी गायकवाड यांच्यासह कार्यक्रम यशस्वीतेसाठी डॉ. आंबेडकर वाचनालयाचे ग्रंथपाल राजेश गायकवाड, प्रतिक कांबळे, सुरेश कांबळे यांनी परिश्रम घेतले.

### शिवाजी महाविद्यालयाची शुभांगी सीतापुरे एमए इतिहास विषयात विद्यापीठात प्रथम




**आरंभ मराठी । उमरगा**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठच्या मार्च–एप्रिल २०२४ मध्ये झालेल्या परीक्षेमध्ये पदव्युत्तर परीक्षेत एमए इतिहास या विषयात विद्यापीठात प्रथम येण्याचा मान श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा येथे एमए इतिहास द्वितीय वर्षात शिकत असलेल्या शुभांगी सीतापुरे हिने पटकावला. विद्यापीठ परीक्षेत एमए इतिहास विषयात सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांना सौ. करूना ज्ञानेश्र्वर चापोलीकर मेमोरियल पारितोषिक दिले जाते. हे पारितोषिक कु. शुभांगी सीतापुरे यांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संजय अस्वले यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे, इतिहास विभागाचे विभाग प्रमुख डॉ.गिरीधर सोमवंशी, डॉ. बी जी माने, प्रा. संग्राम जाधव, प्रा. पंढरीनाथ बनसोडे उपस्थित होते.

## नळदुर्ग येथे ज्ञानेश्वर पारायण व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**आरंभ मराठी । नळदुर्ग**

नळदुर्ग शहरातील व्यासनगर येथे शुक्रवार दि. १८ ऑक्टोबर ते दि. २४ ऑक्टोबर या कालावधीत श्री ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताह सोहळा आयोजित करण्यात आला आहे. सप्ताह कालावधीत प्रवचन, कीर्तन, हरिजागर व महिला भजनी मंडळाच्या कार्यक्रमासह विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. श्री ज्ञानेश्वरी पारायण कालावधीत दररोज पहाटे ४ ते ६ काकडा आरती ,सकाळी ६ ते ७ माऊलीची पूजा, ७ ते ९ ज्ञानेश्वरी वाचन, दुपारी बारा ते चार गाथा भजन व महिला भजन, त्यानंतर साडेचार ते साडेपाच पर्यंत प्रवचन, नामजप, सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ , त्यानंतर रात्री ९ ते ११ हरिकीर्तन ,१२ ते पहाटे ४ हरीजागर असे दैनंदिन कार्यक्रम होणार आहेत. दि.१८ ते २४ ऑक्टोबर या दरम्यान श्री ह भ प बली बागल महाराज चिकुंद्रा, ह भ प संजय पवार महाराज शहापूर, तात्या महाराज सलगरा, मोहन पाटील किलज, कृष्णात जाधव, राजू पाटील वागदरी यांचे प्रवचन तर



ह भ प महेश महाराज माकणी, विश्वनाथ गर्जे महाराज, प्रल्हाद सरडे महाराज नांदुरी, लक्ष्मण महाराज सोलापूर, राम महाराज गायकवाड चिकुंद्रा, गुरुवर्य ऋषिकेश महाराज वासकर यांचे कीर्तन होणार आहे. त्याचबरोबर गुरुवार दि. २४ रोजी गुरुवर्य श्री अप्पासाहेब महाराज दिंडेगावकर यांच्या हस्ते कालावाटप तर श्रीहरी ढेरे महाराज यांचे काल्याचे किर्तन होईल. यावेळी शिवाजी व–हाडे गुरुजी यांच्या वतीने महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. तसेच बुधवारी सायंकाळी पाच वाजता दिपोत्सव कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. तरी नळदुर्ग शहर व परिसरातील भाविक भक्तांनी याचा लाभ घेण्याचे आवाहन पारायण समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## भोसले हायस्कूलमध्ये आकाशकंदील निर्मिती स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**आरंभ मराठी । धाराशिव**

दीपावलीच्या पाश्र्वभूमीवर मुलांच्या कल्पकतेला व सृजनशीलतेला वाव मिळावा या हेतूने भोसले हायस्कूल प्रशालेमध्ये कार्यानुभव विषयांतर्गत (छ्ब्ड्ट्त्र) कौशल्य विकास कार्यानुभव शिक्षिका सौ. पी. डी. परतापुरे यांनी सर्व विद्यार्थ्यांना आकाशकंदील कसे बनवावे याचे मार्गदर्शन करून स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेमधे तब्बल २५१ विद्यार्थांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला व सर्व विद्यार्थांनी एका पेक्षा एक सुंदर आकाश कंदील बनवले. या स्पर्धा संपन्न होत असताना विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यासाठी आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष तथा प्रशालेचे माजी प्राचार्य डॉ. व्ही. बी. पडवळ, प्राचार्य नंदकुमार नन्नवरे, उपमुख्याध्यापक प्रमोद कदम, पाचवी विभागाचे पर्यवेक्षक धनंजय देशमुख उपस्थित होते. या सर्व पदाधिकाऱ्यांनी पाचवीच्या सर्व विद्यार्थ्यांचे भरभरुन कौतुक केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच पाचवी विभागातील सर्व शिक्षक, शिक्षिका यांचे कौतुक केले. हा कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न करण्यासाठी कार्यानुभव शिक्षिका सौ.पी.डी. परतापुरे तसेच सुरज सपाटे यांनी मोलाचे परिश्रम घेतले. तसेच हा कार्यक्रम पार पडण्यासाठी इयत्ता पाचवीच्या सर्व कर्मचारी बंधू भगिनींनी मोलाचे सहकार्य केले. सर्वांच्या सहकार्यातून हा कार्यक्रम उत्साही वातावरणात संपन्न झाला.

## तेरणा स्पर्धा परीक्षा अध्ययन केंद्रात वाचन प्रेरणा दिन साजरा

**आरंभ मराठी । धाराशिव**

माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिन वाचन प्रेरणा दिनकै सो डॉ. चंद्रकलादेवी पद्मसिंह पाटील ग्रंथालय व तेरणा स्पर्धा परीक्षा अध्ययन केंद्र धाराशिव येथे साजरा करण्यात आला .

प्रथम डॉ कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन विठ्ठल गायकवाड यांनी करून त्यांनी डॉ कलाम यांच्याविषयी आपले विचार मांडले. यावेळी ते म्हणाले की,

डॉ.कलाम यांच्या व्यक्तिमत्वाचे विविध पैलू होते. त्यांच्यामध्ये असणारी दुर्दम्य इच्छाशक्ती, आत्मविश्वास, कणखर मन आणि दिलदार स्वभाव. यामुळेच डॉ.कलाम यांनी देशाच्या युवा पिढीला आपल्या विचारांनी आणि कर्तृत्वाने भारावून टाकले होते. भारत नक्कीच महासत्ता बनेल असा विश्र्वास त्यांनी प्रत्येक भारतीयाच्या मनात निर्माण



केला होता. त्यांनी लिहिलेल्या अनेक पुस्तकांमधून येणाऱ्या काळात भारत कसा महासत्ता म्हणून पुढे येणार आहे, भारताची खरी शक्ती ही युवाशक्ती कशी असणार आहे, हे त्यांनी सांगितले आहे. डॉ.कलाम यांचे लेखन स्फूर्तीदायी आहे. त्यामुळे शाळा–महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी डॉ.कलाम यांची पुस्तके वाचावीत, त्याचबरोबर इतर साहित्याचेही जास्तीत जास्त वाचन करावे आणि विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, या दृष्टीने वाचन प्रेरणा दिवसाचे आयोजन केले जात आहे असे विठठल गायकवाड यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाळकृष्ण खोत यांनी केले. प्रस्तावना नामदास नागेश यांनी केली व आभार दिपक गेजगे यांनी मानले.

## प्रशासकीय अधिकाऱ्यांनी चालत गाठले तुळजापूर, पालिकेकडून स्वागत



**आरंभ मराठी । तुळजापूर**

प्रतीवर्षाप्रमाणे कोजागिरी पौर्णिमे निमित्त या वर्षीदेखील धाराशिवचे जिल्हाधिकारी तथा मंदिर संस्थानचे अध्यक्ष डॉ. सचिन ओंबासे, मुख्य कार्यकारी अधिकारी मैनक घोष, निवासी उपजिल्हाधिकारी श्रीमती शोभा जाधव यांनी आई तुळजाभवानीच्या दर्शनासाठी धाराशिव येथून चालत जात तुळजापूर गाठले. तुळजापूर नगर पालिकेच्या वतीने सर्व अधिकाऱ्यांचे शाल, फेटा, कवड्याची माळ व बुके देवुन स्वागत केले. मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार यांच्या हस्ते सर्वांचे स्वागत करण्यात आले. या वेळी नगर परिषदेतील सर्व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### उड्डाणपूलाअभावी होणाऱ्या अपघातांना आळा

# सिंदफळ येथे १९ कोटींच्या उड्डाणपुलाचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते भूमिपूजन

**आरंभ मराठी । धाराशिव**

तुळजापूर–सोलापूर महामार्गावरील सिंदफळ गावाजवळ औश्र्याकडे जाणारा लातूर रॉड जंक्शन उड्डाणपूल नसल्यामुळे अनेक अपघात झाले. दुर्दैवाने अनेकजणांना त्यामुळे कायमचे अपंगत्व देखील आले आहे. भविष्यात या परिसरात केवळ उड्डाणपुलाअभावी अपघाती परिस्थिती ओढावू नये, यासाठी आपण राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व केंद्र सरकारकडे पाठपुरावा केला होता. त्याला यश आले आहे. साधारणतः १९ कोटी रूपये खर्चून सिंदफळ येथील लातूर पर्यायी महामार्गावर जंक्शन उड्डाणपूल उभारला जाणार आहे. त्यामुळे स्थानिक वाहतुकीला आणि नागरिकांना त्याचा फायदा होणार असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली.

आमदार राणा पाटील यांच्या हस्ते मंगळवार,१५ ऑक्टोबर रोजी सकाळी सिंदफळ येथे उड्डाणपुलाच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले. यावेळी ते म्हणाले, जिल्ह्यातील रस्ते राष्ट्रीय महामार्गालगत असलेले पर्यायी रस्ते, त्यावरील उड्डाणपुल, पथदिवे अशा विविध कामांसाठी आपण केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे जिल्ह्यातील नागरिकांची गैरसोय दूर व्हावी यासाठी मागणी केली होती. केंद्रशासन आणि राज्यसरकारच्या माध्यमातून तुळजापूर तालुक्यातील विविध महामार्ग आणि महत्वाच्या रस्त्यांसह जिल्हा मुख्यालय



असलेले धाराशिव शहर, बार्शी, सोलापूर–येडशी महामार्ग आदी अनेक ठिकाणी अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या कामांना गती देण्यासाठी प्रयत्न केले. प्रवाशांना कराव्या लागत असलेल्या गैरसोयी दूर करण्यासाठी ही सर्व कामे मंजूर करून घेतली. त्यासाठी मोठ्या प्रमाणात केंद्र आणि राज्य सरकारकडून निधीही उपलब्ध करून घेतला. त्यापैकीच १९ कोटी ८२ लाख रूपये खर्चून सिंदफळ येथे लातूर पर्यायी महामार्गावर आता लातूर रोड जंक्शन उड्डाणपुल उभारला जाणार आहे. गावकर्यांची सोय व्हावी, त्यांच्या वाट्याला अपघाती परिस्थिती ओढवली जाऊ नये, यासाठी केलेल्या पाठपुराव्याला केंद्रातील आपल्या एनडीए सरकारने बळ दिले असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील म्हणाले. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या अनेक महत्वपूर्ण प्रकल्प आणि योजनांना महायुती सरकारने हिरवा कंदिल दिला आहे. त्यामुळे मोठ्या वेगात जिल्ह्याचा चेहरामोहरा सध्या बदलत आहे. अनेक महत्वपूर्ण प्रकल्प निर्णायक टप्प्यावर आहेत. जिल्ह्याच्या दळणवळणासाठी अत्यंत महत्वाच्या असलेल्या वेगवेगळ्या रस्त्यांसाठी केंद्र सरकारच्या माध्यमातून तब्बल १७४ कोटींचा निधी उपलब्ध झालेला आहे. या सर्व कामांचे भूमिपूजन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते ऑनलाईन प्रणालीद्वारे झालेले आहे आणि त्यातील बहुतांश कामे सध्या प्रगतीपथावर आहेत. जिल्ह्यातील कौडगाव एमआयडीसीप्रमाणेच तामलवाडी एमआयडीसी देखील लवकरच आकाराला येईल. तामलवाडी आणि कौडगाव एमआयडीसीच्या माध्यमातून येथील स्थानिक तरूणांच्या हाताला मोठ्या प्रमाणात रोजगार मिळणार आहे. या दोन्ही ठिकाणी साधारणपणे २२ हजाराहून अधिक रोजगार निर्मिती होणार असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी यावेळी नमुद केले.

THIS LETTER PRINTED BY ADESH PRINTERS, RAMKRUSHNA COLONY, GAWALI WADA, DHARASHIV, TQ. & DIST. DHARASHIV (MHARASHTRA) AND PUBLISHED BY RAMKRISHNA COLONY, GAWALI WADA, DHARASHIV, TQ. & DIST. DHARASHIV (MHARASHTRA) ON BEHALF OF CHANDRASEN GOVINDRAO DESHMUKH AND PRINTED AT ADESH PRINTERS, RAM- KRUSHNA COLONY, GAWALI WADA, DHARASHIV, TQ. & DIST.DHARASHIV (MHARASHTRA) AND PUBLISHED AT RAMKRISHNA COLONY, GAWALI WADA, DHARASHIV, TQ. & DIST. DHARASHIV (MHARASHTRA) EDITOR SHRI. CHANDRASEN GOVINDRAO DESHMUKH.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८०

# धाराशिव-कळंब मतदारसंघात राजकीय आखाडा पेटला

## महायुतीकडून इच्छुकांची संख्या वाढली

**गजानन तोडकर । आरंभ मराठी**



राज्यात विधानसभा निवडणुकीचे वारे वाहू लागले आहे. राज्यात नुकतीच १५ ऑक्टोबर पासून आचारसंहिता लागली आहे. निवडणुकांच्या दृष्टीने प्रशासन सज्ज झाले आहे. नेते मंडळीचे लक्ष आपली योग्यता पक्षाकडे सिध्द करण्याकडे लागले आहे. मतदार मात्र आपला कल काय असेल याचा ताळमेळ लागू देत नाही. ज्यांनी सर्वसामान्यांची कामे केली आहेत ते राजकीय नेते त्यांच्या कामाच्या याद्या तयार करण्यात व्यस्त झाले आहेत. धाराशिव जिल्ह्यातील चार मतदार संघांपैकी धाराशिव - कळंब विधानसभा मतदार संघाची चर्चा वाढली आहे. राज्यात मराठा - ओबीसी आरक्षणाचा मुद्दा मतदानावर परिणाम करणारा ठरणार आहे. बऱ्याच भावी आमदारांनी खेड्यापाड्यात भेटी-गाठी घेण्यावर भर दिला आहे. जिल्ह्यात व कळंब तालुक्यातही गेल्या काही दिवसांपासून भावी आमदार असे फलक पाहायला मिळत होते . आजी, माजी व भावी आमदारांनी ग्रामीण भागात भेटी घेऊन आपले वर्चस्व दाखवण्यासाठी संवाद दौरे आणि मेळावे काढले होते. निवडणुकीच्या

### धाराशिव कळंब विधानसभा मागील मताधिक्य

मागील विधानसभा निवडणुकीत शिवसेनेच्या कैलास पाटील यांनी १३ हजार ४६७ एवढ्या मताधिक्याने बाजी मारली होती. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचहे उमेदवार संजय निबाळकर यांचा पराजय झाला होता. तर अपक्ष म्हणून लढलेले उमेदवार अजित पिंगळे यांच्या शिट्टी चिन्हाला वीस हजारांपेक्षा अधिक मतदान झाले होते. तसेच वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार धनंजय शिंगाडे यांनीही १५ हजाराच्या पुढे मतदान मिळवले होते.

## विद्यमान आ. कैलास पाटील यांच्यासमोर कोणाचे असणार आव्हान?

### कळंब तालुक्यात वर्चस्व कोणाचे ?

२०१९ च्या मागील विधानसभा निवडणुकीच्या वेळी शिवसेनेच्या कैलास पाटील यांना शिवाजी कापसे यांची साथ होती. गेल्या काही काळात जिल्ह्यातील राजकीय वातावरण मोठ्या प्रमाणात बदलले आहे. कळंबचे शिवसेना तालुका प्रमुख राहिलेले शिवाजी कापसे यांनी नुकताच शिंदे गटात प्रवेश केला. कळंब कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून कळंब मध्ये विकासकामे केली असल्याचा दावा कापसे यांच्याकडून केला जात आहे. काही दिवसापूर्वीच त्यांनी हजारो शिवसैनिकांसह पालकमंत्री तानाजीराव सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिंदे गटात पक्ष प्रवेश केला. बऱ्याच काळापासून कापसे यांचे पक्षांतर होणार अशा बातम्या येत होत्या. पक्षांतर केल्यानंतर धाराशिव-कळंब मधून शिवाजी कापसे संभाव्य उमेदवार असतील अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.

### महायुतीकडून अनेकजण इच्छुक

महाविकास आघाडीकडून विद्यमान आमदार कैलास पाटील हेच पुन्हा उमेदवार असतील अशी शक्यता आहे. दुसरीकडे महायुतीच्या तिन्ही पक्षातून अनेकजण इच्छुक आहेत. भाजपा तालुकाध्यक्ष अजित पिंगळे यांनी नवरात्रात काढलेल्या शक्ती पदयात्रेतून उमेदवारीची दावेदारी केली. त्याचबरोबर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत, शिंदे सेनेचे नितीन लांडगे, भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे, भाजपा नेत्या सरोजनी राऊत अश्या बऱ्याच उमेदवारांची नावे चर्चेत आहेत. यातील अनेक नेत्यांनी पक्ष श्रेष्ठींकडे आपल्या कामाचा अहवाल सादर करून आमदारकी साठी तयारी सुरु केली आहे. मात्र बऱ्याच जणांना पक्षाकडून आश्र्वासन मिळाले व परंतु कोणाच्या नावाची वर्णी कोणत्या पक्षाकडून लागणार यावरून पुढील राजकारणातील डावपेच दिसून येणार आहेत.

### पालकमंत्री डॉ. तानाजीराव सावंत ताकत दाखवणार

शिंदे गटात होणारे वाढते पक्ष प्रवेश यावरून हे दिसून येत आहे की, कळंब -धाराशिव मतदार संघाकडे पालक मंत्री तानाजी सावंत यांनी बारीक लक्ष दिले आहे. कळंब बाजारपेठ ही जिल्ह्यातील बाजारपेठेपेक्षा खुप मोठी आहे. या ठिकाणी आर्थिक उलाढाल खूप मोठ्या प्रमाणात होत असते. त्यामुळेच पालकमंत्री डॉ. तानाजीराव सावंत यांच्याकडून कळंब येथील श्री संत शिरोमणी या तीर्थ क्षेत्रास तीन कोटींचा निधी मंजूर करून १ कोटींचा निधी वितरित केला आहे व त्याचे भूमिपूजन धनंजय सावंत यांच्या हस्ते करण्यात आले आहे. तसेच बारा वर्षे बंद असलेला तेरणा कारखाना सावंत यांनी भाडेतत्त्वावर घेऊन सुरू केला. त्याचाही फायदा त्यांना आगामी निवडणुकीत होऊ शकतो असे बोलले जात आहे.

कारणाने धाराशिव जिल्ह्यात राजकीय आखाडा पेटला असून आगामी काळात उमेदवार निश्चित झाल्यावर त्यात आणखी भर पडणार आहे.

## ठळक

### उच्च शिक्षणासाठी परदेशात निवड झाल्याबद्दल तेजस्विनी ठेले यांचा सत्कार



**आरंभ मराठी । तुळजापूर**

युनिव्हर्सिटी कॉलेज ऑफ लंडन येथे उच्च शिक्षण घेण्यासाठी निवड झाल्याबद्दल तुळजापूर खुर्द येथील विद्यार्थिनी तेजस्विनी शंकर ठेले हिचा शाळेतर्फे सत्कार करण्यात आला. तेजस्विनीचे प्राथमिक शिक्षण नगरपरिषद प्राथमिक शाळा क्र.३ तुळजापूर येथे तर पदवीचे शिक्षण अपसिंगा रोड येथील टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स येथे झाले आहे. तिने एम. ए. एज्युकेशन चे शिक्षण अजीम प्रेमजी युनिव्हर्सिटी, बेंगलोर येथे पूर्ण केले आहे. एम.एस सी इन सोशल डेव्हलपमेंट यामध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी तिची निवड युनिव्हर्सिटी कॉलेज ऑफ लंडन येथे झाली आहे. तिच्या संपूर्ण शिक्षणाचा खर्च हा ओबीसी महामंडळामार्फत करण्यात येणार आहे. तिच्या या यशाबद्दल शाळेच्या वतीने तिचा जाहीर सत्कार करण्यात आला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक तुकाराम मोटे, शिक्षण विभाग प्रमुख अशोक शेंडगे, शंकर ठेले, ज्योती शंकर ठेले तसेच शाळेतील सर्व शिक्षक उपस्थित होते.

### मुलात छत्रपती संभाजी नगर तर मुलीत मुंबईने पटकाविले विजेतेपद
### राज्य व्हॉलीबॉल स्पर्धा : यजमान लातूर विभागाचे दोन्ही संघ राहिले उपविजेते



**आरंभ मराठी । धाराशिव**

मंगळवारपासून शहरातील छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या मैदानावर सुरू असलेल्या राज्यस्तरीय शालेय व्हॉलीबॉल स्पर्धेतील अंतिम सामन्यात मुलांमधून छत्रपती संभाजी नगर संघाने तर मुलींमधून मुंबई संघाने वर्चस्व प्रस्तापित करत विजेतेपद पटकाविले आहे. यजमान लातूर विभागाच्या दोन्ही संघास उपविजेतेपदावर समाधान राहावे लागले. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि धाराशिव जिल्हा व्हॉलीबॉल संघटनेच्या वतीने १९ वर्षे वयोगटातील मुला मुलींच्या राज्यस्तरीय शालेय व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेतील अंतिम सामने रात्री उशिरापर्यंत स्पर्धेस रंगात आणणारे ठरले असून मुलांच्या अंतिम सामन्यात छत्रपती संभाजी नगर विभागाच्या संघाने लातूर विभाग संघावर ३ - ० गुणाने विजय प्रस्तापित केला तर मुलींच्या अंतिम सामना मुंबई विभाग विरुद्ध लातूर विभागात झाला. यामध्ये पहिला सेट मुंबई संघाने जिंकला नंतर लातूर विभागाने २ रा व ३ रा सेट जिंकल्यानंतर यजमान संघाचे मनोबल वाढले. स्पर्धेवर पकड ठेवत शेवटचे २ सेट जिंकत मुंबई संघाने विजेतेपद पटकाविले. मुंबई विभागाच्या संघास विजेतेपद पटकावून देण्यास मृणाल आगरकर महत्वपूर्ण ठरली.

### कोजागिरी पौर्णिमेनिमित्त एकोडी येथील संजीवनी स्कूलमध्ये रंगला गरबा



**आरंभ मराठी । उमरगा**

उमरगा तालुक्यातील एकोडी येथील संजीवनी मॉडर्न इंग्लीश स्कूलमध्ये कोजागिरी पौर्णिमेचे औचित्य साधून गरबा उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शाळेतील विद्यार्थी आणि पालकांनी गरबा आणि दांडियात सहभागी होत एकच जल्लोष करत नवरात्रोत्सव उत्साहात साजरा केला.

या नवरात्र उत्सवानिमित्त संजीवनी मॉडर्न इंग्लीश स्कूलमध्ये गरबा आणि दांडिया कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला नवदुर्गांच्या वेशात आलेल्या विद्यार्थिनींच्या हस्ते दुर्गा मातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी दुर्गामाता स्तोत्रांचे गायनही करण्यात आले. महिषासुरमर्दिनी मातेचे गीत गायन करून गरबा व दांडिया खेळाला सुरुवात केली. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्था अध्यक्ष अनुप चिंचोळी, लक्ष्मीताई चिंचोळी, कार्यवाहक धनराज कांबळे व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

### वाढदिवसाचा खर्च टाळून मूकबधिर शाळेतील विद्यार्थ्यांना कपड्यांचे वाटप

**आरंभ मराठी । नळदुर्ग**

युनिटी मल्टीकॉन्स कंपनीचे कार्यकारी संचालक कपिल मौलवी यांच्या वाढदिवसानिमित्त दिनांक १७ ऑक्टोबर रोजी चैतन्य मूक बधिर शाळेतील २५ विद्यार्थ्यांना दिवाळीसाठी नवीन कपडे देण्यात आले. महाराष्ट्रातील प्रसिद्ध उद्योगपती आणि युनिटी मल्टीकॉन्स कंपनीचे कार्यकारी संचालक कपिल मौलवी यांचा वाढदिवस नळदुर्ग येथे युनिटीच्या वतीने मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. चैतन्य मुख्यमंत्री शाळेतील विद्यार्थ्यांना ड्रेसचे वाटप करण्यात आल्यानंतर एक वेगळाच आनंद विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसून आला. यावेळी विलास येडगे, सुहास येडगे, माजी नगरसेवक सुधीर हजारे, मारुती खारवे, पद्माकर घोडके, बंडप्पा कसेकर, सामाजिक कार्यकर्ते अमर भाळे, उत्तम बनसगोळे, उमेश जाधव युनिटीचे व्यवस्थापक जुबेर काझी, जनसंपर्क अधिकारी विनायक अहंकारी प्रदीप गायकवाड उपस्थित होते.

## भारतीय मानक ब्युरो दिवस जिल्हा परिषद हायस्कूल उमरगा येथे साजरा

**आरंभ मराठी । उमरगा**



उमरगा शहरातील जिल्हा परिषद हायस्कूलमध्ये जागतिक मानक दिन साजरा करण्यात आला. यावेळी डॉ.अनंत मुगळे, आकांक्षा चौगुले, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा शकुंतला मोरे, मुख्याध्यापक पद्माकर मोरे, बी आय एस प्रमुख बशीर शेख, विद्यानंद सुत्रावे, धनराज तेलंग उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात बीएसआय मानक गीताने झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी नुक्कड नाटक सादर केले. यामध्ये आयएसआय, हॉलमार्क व रजिस्ट्रेशन मार्क यावर आधारित ही नाटिका सादर करण्यात आली. त्यानंतर पारंपरिक नृत्य सादर करण्यात आले. यावेळी मानक प्रतिज्ञा सर्व विद्यार्थ्यांना देण्यात आली व त्यानंतर स्टँडर्ड रायटिंग कॉम्पिटिशन घेण्यात आली. या स्पर्धे चा निकाल जाहीर करून विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. निबंध स्पर्धेत प्रथम आलेले माहिम शानेदिवान, द्वितीय श्रृती जाधव, तृतिय भागवत चौधरी यांना रोख रक्कम व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी शेख बशीर यांनी विद्यार्थ्यांना मानक दिनानिमित्त मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सूत्रावे यांनी तर आभार मुसळे सोनाली यांनी मानले. शेवटी अल्पोपहार देऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

### महाविकास आघाडीतून उद्धव ठाकरेच मुख्यमंत्री होणार, अनिल परब यांचे मोठे वक्तव्य

**आरंभ मराठी । मुंबई**

येत्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुती आणि महाविकास आघाडी यांच्याकडून जोरदार तयारी करण्यात येत आहे. दोन्ही बाजूंकडून एक-दोन दिवसांत जागावाटपाचा तिढा सुटण्याची शक्यता आहे, असंही सांगण्यात येतंय. खरं तर मागील काही दिवसांपासून महाविकास आघाडीमध्ये मुख्यमंत्रिपदाचा चेहरा घोषित करा, अशी आग्रही मागणी शिवसेना (ठाकरे गटाचे) प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केली होती.

## सांगवी मार्डी ते सारोळा रस्त्यावर भला मोठा खड्डा; अपघाताची शक्यता



**आरंभ मराठी । तुळजापूर**

तुळजापूर तालुक्यातील सांगवी मार्डी ते सारोळा या रस्त्यावर भला मोठा जीवघेणा खड्डा पडला असून, यामुळे वाहनधारकांना मोठ्या अडचणीला सामोरे जावे लागत आहे. तसेच या रस्त्यावर अनेक ठिकाणी छोटे-मोठे अपघात घडत आहेत. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग दुर्लक्ष करत असून हा खड्डा तात्काळ दुरुस्त करावा अशी मागणी ग्रामस्थ करत आहेत. तसेच इतरत्रही अनेक ठिकाणी खड्डे पडले असून, हा रस्ता तात्काळ दुरुस्त करण्याची मागणी वाहनधारक तसेच नागरिक करत आहेत.

### कळंब उपजिल्हा रुग्णालयात शनिवारी मोफत कॅन्सर शिबीर

**आरंभ मराठी । कळंब**

कळंब येथील कै.विजयाताई रामकृष्ण लोंढे यांच्या स्मरणार्थ उपजिल्हा रूग्णालय येथे शनिवारी (दि. १९) रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ४ या वेळेत रोटरी क्लब ऑफ कळंब सिटी, इनरव्हिल क्लब कळंब व इंडियन मेडिकल असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने मोफत कॅन्सर निदान मार्गदर्शन शिबीर आयोजित करण्यात आले आहे. त्याचबरोबर या शिबिरात कॅन्सर विषयी जनजागृतीपर रंगीत भित्तीचित्रांचे प्रदर्शन भरविण्यात आले आहे. शिबीरार्थीची बार्शी येथील टाटा मेमोरिअल कॅन्सर हॉस्पिटलच्या तज्ञामार्फत तपासणी करण्यात येणार असून विविध प्रकारच्या चाचण्या (टेस्ट) विनामूल्य केल्या जाणार आहेत. तरी जास्तीत जास्त जनतेने शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजकांकडून करण्यात आले आहे.

## विद्यानिकेतन विद्यालयाचे संस्थापक सचिन पाटील यांची विभागीय शिक्षण मंडळाच्या व्यवस्थापन समिती सदस्य पदी नियुक्ती

**आरंभ मराठी । येरमाळा**



विद्यानिकेतन विद्यालयाचे संस्थापक सचिन पाटील यांची विभागीय शिक्षण मंडळ लातूर विभाग व्यवस्थापन समिती सदस्यपदी निवड झाली.

विभागीय माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ लातूर यांच्या कार्यकारणी समितीवर अशासकीय सदस्याचे नामनिर्देशन करण्यात आले. हे नामनिर्देशन लातूर विभागीय मंडळाच्या कार्यकारी समितीच्या रिक्त पदावर शालेय शिक्षण मंत्री यांनी केलेल्या शिफारशीने नामनिर्दे शनाने अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्यात आली. यामध्ये व्यवस्थापन समिती सदस्यपदी (कनिष्ठ महाविद्यालय) येरमाळ्याचे सचिन दत्तात्रय पाटील संस्थापक विद्यानिकेतन माध्यमिक व जुनियर कॉलेज यांची व्यवस्थापन समिती कनिष्ठ महाविद्यालय सदस्य पदी नियुक्ती करण्यात आली. शैक्षणिक क्षेत्रात सचिन पाटील यांचे योगदान आहे. कळंब तालुक्यातील दुर्गम भागातील शेलगाव (दि.) या गावचे ते रहिवासी आहेत. त्यांच्या निवडीमुळे परिसरातील सचिन पाटील यांचे अभिनंदन होत आहे.

## श्री तुळजाभवानी सैनिक विद्यालयाचा सॉफ्टबॉल संघ राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र



**आरंभ मराठी । तुळजापूर**

दिनांक १५ व १६ ऑक्टोबर २०२४ रोजी नांदेड याठिकाणी झालेल्या विभागस्तर शालेय सॉफ्टबॉल स्पर्धेत तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी सैनिकी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील १४ वर्षाखालील मुलांच्या संघाने लातूर विभागीय शालेय सॉफ्टबॉल स्पर्धेत विजेतेपद प्राप्त केले. तसेच हा संघ राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरला. या संघाला मुगुटराव अशोक यांनी मार्गदर्शन केले होते. या विजेत्या संघातील सर्व खेळाडू व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे तसेच सर्व विश्र्वस्त व शाळेचे कमांडंट मकरंद देशमुख प्राचार्य वैजनाथ घोडके , पर्यवेक्षक डॉ.पेटकर व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करुन व पुढील राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# सोलापूर-हैदराबाद रोडवर मालवाहतूक ट्रक पलटी

**आरंभ मराठी । नळदुर्ग**

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६५ सोलापूर हैदराबाद रोडवरील आलियाबाद शिवारातील आपलं घर परिसरात वळण रस्त्यावरील घाटात हैदराबाद हून गुजरात कडे तांदूळ घेऊन निघालेला सोळा चाकी मालवाहतूक करणारा ट्रक अचानक पलटी झाल्यामुळे तब्बल आठ तास वाहतुकीची मोठ्या प्रमाणात कोंडी झाली होती. याबाबत अधिक माहिती अशी की, आलियाबाद शिवारातील आपलं घर जवळ असलेल्या वळण रस्त्यावरील घाटात १७ ऑक्टोबर रोजी दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास हैदराबाद हून गुजरात कडे तांदूळ भरून निघालेला सोळा चाकी ट्रक (क्रमांक GJ-36X-2233) हा चालकाचा स्टेरिंग वरील ताबा सुटल्यामुळे पलटी झाला. त्यामुळे रस्त्यावर जिकडेतिकडे तांदूळ रस्त्यावर विखुरला होता. त्याचबरोबर वाहन रस्त्याच्या मधोमधी घसरून पडल्यामुळे त्याच्या पाठीमागे असणारे व समोरून येणारे शेकडो वाहने रस्त्यावरच अडकून पडल्यामुळे रस्त्याच्या दोन्ही बाजूला वाहनांच्या रांगाच रांगा लागल्या होत्या. अपघातग्रस्त वाहनाने पूर्ण रस्ताच व्यापून घेतल्यामुळे रस्त्याच्या दोन्ही बाजूला सुमारे दोन किलोमीटर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या याची माहिती मिळाल्यानंतर महामार्ग व नळदुर्ग पोलीस ठाण्याचे कर्मचारी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन एकेरी वाहतूक सुरु करून वाहतूक सुरळीत करण्याचा प्रयत्न केला मात्र राष्ट्रीय महामार्गावर मोठ्या प्रमाणात वाहनाची गर्दी असल्याने तसेच पर्यायी रस्ता नसल्याने तब्बल सहा तासानंतर अपघात ग्रस्त वाहनाला मोठी क्रेन व जेसीबीच्या साह्याने बाजूला काढून एकेरी वाहतूक सुरु करण्यात आली. त्यानंतर सुमारे दोन तासानंतर पूर्ण वाहतूक सुरळीत झाली. एकूण आठ तास वाहतूक ठप्प झाल्यामुळे तुळजापूर येथे आई तुळजाभवानीच्या दर्शनाकरिता निघालेल्या भाविकांना तसेच वाहन चालकांना त्रास झाला.

### महामार्गावर आठ तास वाहतूक कोंडी



### बायपास रस्त्याचे काम होणे गरजेचे

बायपास रस्त्याचे काम तात्काळ होणे गरजेचे आहे. कारण नळदुर्ग शहरातून जाणाऱ्या महामार्गावर आठवड्यातून दोन-तीनदा वाहतुकीची कोंडी होवून ट्राफिक जाम होते. अनेकदा वाहनांमध्ये अर्जंट डिलिव्हरीचा माल असल्याने माल रिकामे होण्याच्या ठिकाणी वेळेवर पोहोचणे गरजेचे असते. त्यासाठी वाहन चालक घाई गडबडीत निघतो. मात्र महामार्गावर वेळोवेळी होत असलेल्या ट्रॅफिक ज्यामुळे वेळेवर पोहोचणे तर कठीणच आहे. उलट रांगेमध्ये उभे राहिल्यानंतर वाहन चालू ठेवल्यामुळे इंधनाचा खर्च वाढतो.